2 9 AUG 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# २४० प्राध्यापकांच्या संशोधनांची माहिती एका क्लिकवर!

## शिवाजी विद्यापीठ : फॅकल्टी प्रोईल विकसित; 'नॅक'च्या दृष्टीने ठरणार महत्त्वपूर्ण

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राने इंडियन रिसर्च इन्फॉर्मेशन नेटवर्क सिस्टीम (इरिन्स) हा प्रकल्प सुरू केला असून, फॅकल्टी प्रोफाईल विकसित केली आहे. या प्रकल्पामुळे सर्व प्राध्यापकांच्या २४० रिसर्च प्रोफाईल्स आता विद्यापीठाच्या वेबसाईटवरून जगाला पाहता येणार आहेत. 'नॅक'च्या दृष्टिकोनातून विद्यापीठातील प्राध्यापकांची सर्च प्रोफाईल वेबसाईटवर असणे महत्त्वाचे ठरणार आहे

विद्यापीठातील प्रत्येक प्राध्यापक संशोधन प्रबंध, पब्लिकेशन्स राज्यासह जगभरात विविध ठिकाणी सादर करीत असतात. मात्र, विद्यार्थ्यांसह इतर घटकांना याची माहिती नसते. ती माहिती सहजपणे उपलब्ध व्हावी, प्राध्यापकांचे प्रोफाईल अपडेट व्हावे यासाठी बॅ. खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राने इन्फॉर्मेशन अँड लायब्ररी नेटवर्क सेंटर (इन्फ्लिबनेट) गांधीनगर (गुजरात) यांनी सेंट्रल



युनिव्हर्सिटी ऑफ पंजाब यांच्या सहकार्याने विकसित केलेला (इरिन्स) हा प्रकल्प कार्यान्वित केला आहे. विद्वत्तापूर्ण संप्रेषण कार्य संकलित करण्यासाठी, त्यांचे प्रदर्शन करण्यासाठी व नवीन नेटवर्क तयार करण्याची संधी विद्वान लोकांना प्रदान करून देणारी ही एक महत्त्वपूर्ण सुविधा आहे. या सुविधेअंतर्गत भारतातील शैक्षणिक, संशोधन आणि विकास संस्थांना मोफत सॉफ्टवेअर सेवा उपलब्ध करून दिली जाते.

**पुढारी विशेष**

विद्यापीठातील संशोधन कार्यातील प्राध्यापकांचे योगदान या सुविधेद्वारे उपलब्ध झाले आहे. फॅकल्टी प्रोफाईल अंतर्गत विविध फॅकल्टी तसेच शास्त्रज्ञ, विद्वत्तापूर्ण संशोधने, संशोधनाचा प्रभाव घटक,

| | |
|---|---|
| विद्यापीठातील अधिविभाग | ४२ |
| सायटेशन्स | ८८२५६ |
| पेटेंट | २८ |
| स्कॉलरली रिसोर्सेस | ५२२२ |
| जर्नल आर्टिकल्स | ४३९० |
| कॉन्फरन्स प्रोसेडिंग | ४१० |
| बुक्स, चॅप्टर इन बुक्स | २५४ |

विभागनिहाय प्रकाशनाची आकडेवारी, टॉप टेन प्रोफाईल्स, प्रत्येक प्रकाशित लेखास प्राप्त साइटेशन, विभाग व प्रकाशनिहाय आलेखपूर्ण एच. इंडेक्सचे सादरीकरण याचा समावेश आहे. उपक्रमाची माहिती http://unishivaji.irins.org विद्यापीठाच्या वेबसाईटवरील 'लिंक'वर पाहता येणार आहे.

भारतातील उच्चशिक्षण क्षेत्रातील सर्व शैक्षणिक व संशोधन संस्थांमध्ये सामान्य व्यासपीठ म्हणून याचा वापर करता येणे शक्य होणार आहे. स्वतंत्र व्यक्ती, विभाग, शाळा, संस्था यांचे 'संशोधन केंद्र साधन' म्हणून याचा उपयोग होईल. विद्यमान संशोधन व्यवस्थापन प्रणाली (एचआर सिस्टीम, मॅनेजमेंट सिस्टीम, गुगल स्कॉलर आयडी) यास ही प्रणाली समर्थन देते. उपलब्ध तंत्रज्ञान, संशोधनाची क्षेत्रे, संशोधनातील अंतर ओळखणे व त्या अनुषंगाने संशोधन निधीसाठी धोरण निर्मिती व सरकारचे साधन म्हणून याचा वापर केला जाऊ शकतो.

### विद्वानांचे नेटवर्क तयार करण्याची संधी

'इन्फ्लिबनेट' सेंटरमार्फत शैक्षणिक, संशोधन व विकास संस्था तसेच शास्त्रज्ञांसाठी वेबआधारित संशोधन माहिती, व्यवस्थापन सेवा याद्वारे सुरू केली आहे. या प्रणालीद्वारे प्राध्यापक, शास्त्रज्ञ व संशोधक यांचे संशोधनामधील विद्वत्तापूर्ण कार्य दर्शवता येणार असून विद्वानांचे नेटवर्क तयार करण्याची संधी मिळणार आहे. संशोधनाची माहिती मुद्रित व आलेखाद्वारे उपलब्ध होणार आहे.

'इरिन्स'मधील माहिती अपडेट करण्याचे काम सुरू आहे. अपडेट झाल्यावर शिवाजी विद्यापीठाचा गुणात्मक व संख्यात्मक संशोधन अधिक प्रभावीरित्या सर्वांसमोर येईल. विद्यापीठातील संशोधनात अग्रेसर असणाऱ्या प्राध्यापकांचे कार्य 'टॉप टेन शास्त्रज्ञ' संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापकांना प्रेरणादायी ठरेल.

**- डॉ. डी. बी. सुतार,**
प्र. संचालक, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र, शिवाजी विद्यापीठ

सकाळ

# विद्यापीठात प्रवेशासाठी सीमाभागातून ८७ अर्ज

## प्रवेश, वसतिगृह व्यवस्था मोफत

बेळगाव, ता. २८ : शिवाजी विद्यापीठात प्रवेश घेण्यासाठी सीमाभागातील ८७ विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. या सर्वांना प्रवेश आणि वसतिगृहाची मोफत व्यवस्था देण्याचा निर्णय झाला आहे. कमी कालावधीतही सीमाभागातील विद्यार्थ्यांनी विद्यापीठ आणि महाराष्ट्र सरकारच्या उपक्रमाला प्रतिसाद दिला.

सीमाभागातील ८६५ गावांमधील विद्यार्थ्यांना विद्यापीठात प्रवेश देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली होती. त्यासाठी मार्गदर्शन कार्यक्रमही झाले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले. महाराष्ट्र एकीकरण समितीने विद्यापीठ व कुलगुरूंचे आभार मानले आहेत. पहिल्या वर्षी विद्यार्थ्यांनी एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी., बी.टेक., एम.सी.ए., एम.बी.ए. व इतर पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी अर्ज केले आहेत.

सीमाभागातील काही विद्यार्थी सध्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षांत शिकत आहेत. त्यांनासुद्धा प्रवेश शुल्कात सवलत मिळणार असून, वसतिगृहही उपलब्ध होईल. सीमाभागातील विद्यार्थ्यांना पीएच.डी. करण्यासाठी वसतिगृह आणि वाचनालयाची व्यवस्था असेल. सीमाभागातील विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या या योजनेचा मोठा लाभ मिळणार आहे. यासाठी मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीने सातत्याने पाठपुरावा केला. या उपक्रमासाठी निवृत्त सनदी अधिकारी दिनेश ओऊळकर यांचे मार्गदर्शन मिळाले.



**“ सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाची ही योजना लाभदायक ठरणार आहे. सीमाभागातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी विद्यापीठात प्रवेश घ्यावा. समितीने याबाबत सातत्याने महाराष्ट्र सरकारकडे पाठपुरावा केला होता.**

**– मालोजी अष्टेकर**, सरचिटणीस, मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समिती

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 AUG 2022 तरूण भारत

# 'विधी' पेपरप्रकरणी सांगलीतील महाविद्यालयाची आज सुनावणी

- शिवाजी विद्यापीठ परीक्षा प्रमाद समितीच्या चौकशीअंती अंतिम निर्णय
- प्राचार्य, एसआरपीडी समन्वयक, पाच विद्यार्थ्यांना हजर राहण्याच्या सूचना

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षा सुरू आहेत. विधी अभ्यासक्रमातील तृतीय वर्षाच्या 'इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी राइट्स" (आयपीआर) या विषयाच्या पेपरसंदर्भात सांगलीतील एका कॉलेजमध्ये गैरप्रकार घडल्याच्या संशयास्पद गोष्टी आढळल्या. त्यामुळे संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य, एसआरपीडीचे समन्वयक आणि पाच विद्यार्थ्यांना आज (दि.२९) रोजी परीक्षा प्रमाद समितीसमोर चौकशीसाठी बोलावले आहे.

परीक्षा प्रमाद समितीच्या चौकशीमध्ये कोणी दोषी आढळल्यास संबंधीतांवर कारवाई केली जाणार आहे. या अगोदरही सांगलीतील एका महाविद्यालयातील लॅब असिस्टंट आणि कर्मचाऱ्याला बडतर्फ केले असून प्राचार्य बदलले आहेत. ही कारवाई तातडीने झाल्याने इतर महाविद्यालयावर वचक बसेल अशी चर्चा होती.हे प्रकरण ताजे असतानाच 'इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी राइट्स" (आयपीआर) या विषयाच्या पेपरसंदर्भात सांगलीतील एका महाविद्यालयात संशयास्पद गोष्टी आढळल्या आहेत. त्यामुळे संबंधीतांना परीक्षा प्रमाद समीतीसमोर सुनावणीसाठी बोलावले आहे. सुकावणी दरम्यान सर्वांची चौकशी करून अंतिम निर्णय घेण्यात येईल.

## रद्द झालेला पेपर आज

विधी अभ्यासक्रमातील तृतीय वर्षाच्या 'इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी राइट्स लॉ' (आयपीआर) या विषयाचा २६ रोजी होणारा पेपर अपरिहार्य कारणाने रद्द केला होता. हा पेपर आज (दि. २९ ) दुपारी १ ते २ या वेळेत होणार आहे. या परीक्षेला न बसणाऱ्या विद्यार्थ्यांची पुन्हा परीक्षा घेतली जाणार नाही, याची महाविद्यालये, विद्यार्थी व पालकांनी नोंद घ्यावी.